## विनोदिनी पाटीलचे धावण्यात स्पृहणीय यश



कोल्हापूर, दि. ९ : येथील कमला कॉलेजची विद्यार्थिनी विनोदिनी शंकरराव पाटील हिने सातारा येथे झालेल्या शासकीय विभागीयस्तर मैदानी क्रीडा स्पर्धामध्ये ८०० मीटर्स धावणे व ४०० मी. अडथळा शर्यतीत प्रथम क्रमांक मिळवला. तसेच तिने ४०० मीटर्स धावण्यात द्वितीय क्रमांक घेतला. तिची अमरावती येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

## विनोदिनी पाटीलचे धावणे, अडथळा स्पर्धेत यश

कोल्हापूर, ता. ८ : कमला कॉलेजच्या विनोदिनी पाटीलने साताऱ्यातील विभागीय मैदानी स्पर्धेत ८०० मीटर धावणे व ४०० मीटर अडथळा शर्यतीत प्रथम क्रमांक मिळवला. आता ती राज्य स्पर्धेत सहभागी होणार आहे.

## कमला कॉलेज अजिंक्य

कोल्हापूर, दि. ११ : शिवाजी विद्यापीठ जिम्नॅशियम हॉल येथे झालेल्या कोल्हापूर विभागीय टेबल-टेनिस स्पर्धेमध्ये कमला कॉलेज संघाला विजेतेपद मिळाले.

या संघात दिपाली भोसले, राजश्री शिंदे, वृषाली पाटील, गीतांजली निंबाळकर व मनिषा किंटे यांचा समावेश होता.

12/10/95 पुढारी

## कमला कॉलेजचे सुयश

कोल्हापूर दि. १२ - शिवाजी विद्यापीठांतर्गत संपन्न झालेल्या बास्केटबॉल व टेबल टेनिस स्पर्धेत येथील कमला कॉलेजने अजिंक्यपद मिळविले. बास्केट बॉल स्पर्धेत तेजस्विनी किल्लेदार, दीपाली कुंमार, वृषाली पाटील, गीतांजली निंबाळकर, करिष्मा नाईक, सुचित्रा औरसंगे, मनिषा किटे, शिल्पा शिंदे, योगिता पवार, मनिषा मृदंगे, सत्यशिला दळवी, भारती चौगले यांचा तर टेबल टेनिस स्पर्धेत दीपाली भोसले, राजश्री शिंदे, वृषाली पाटील, गीतांजली निंबाळकर, मनिषा किटे यांचा सहभाग होता. प्राचार्य क्रांतीकुमार पाटील आणि प्रा. सुनिता काळे यांचे या क्रीडापटूंना मार्गदर्शन मिळाले.